IMPACT FACTOR:4.197(IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 6 SPECIAL ISSUE 1 JUNE 2020

A Bimonthly Peer Reviewed International Journal

Special Issue On

# Life; Culture and Education Today

(Book 1)

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

*Chief Editor*
Dr Kalyan Gangarde

*Guest Editors*
Prin. Dr V.D. Satpute
Prin. Dr V.S.Anigunte
Prin. Dr H.P.Kadam

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**
*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

# अनुक्रमणिका


१. उच्च शिक्षण : व्यक्तिमत्त्व विकास आणि मानवीय मूल्य
डॉ. एस.एन. आकुलवार । ०१

२. कोरोना व्हायरस : भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम
अतुल दत्तु जगताप । १०

३. कोरोना १९ चा भारतातील लघु आणि मध्यम उदयोगावरील परिणाम डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे । १४

४. आदिवासी समाजातील विधवा स्त्रीयांचा दर्जा : एक समाजशास्त्रीय अध्ययन (संदर्भ बिलोली तालूका)
डॉ.सुरेश वि.धनवडे । २२

५. कोव्हिड-19 साथी दरम्यान प्रतिकारक्षमते चे महत्व व भूमिका
प्रा. वाकणकर गोविंद बन्सीधरराव । ३०

६. आंबेडकर विचार: शोधमीमांसा आणि भाष्य
डॉ.बी.एम.काळे । ३४

७. मध्ययुगीन संतकवयित्रीच्या कवितेतील जातलिंगभाव
डॉ. कीर्तीकुमार मोरे । ४१

८. महात्मा गांधीजीचे आदर्श गाव : एक अभ्यास
डॉ. मुरुडकर एम.एस. । ५१

९. कोव्हिड-19 चे रोजगार व बँकिंग क्षेत्रावरील परिणाम: एक चिकित्सक अभ्यास
डॉ. बी. एच. दामजी / श्री निखील महादेव तळेकर । ५३

१०. कोविड -१९ चा भारतावरील आर्थिक व सामाजिक परिणाम
डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई । ५९

११. भारतातील रोजगार,आर्थिक व सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावरिल कोविड – १९ चा परिणाम
डॉ.संजय गव्हाणे । ६५

१२. भिल्लांचा लोकनाट्यप्रकार : सोंगाड्या
डॉ. मोनिका शांतीलाल ठक्कर । ७१

१३. आदिवाशींच्या शिक्षणाचे शवविच्छेदन करणारी कादंबरी : माझी काटेमुंढरीची शाळा
संतोष मारुती लोंढे । ७७


Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

... - ISSN: 2454-5503

६.

# आंबेडकर विचार: शोधमीमांसा आणि भाष्य

डॉ.पी.एम.काळे
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ

आंबेडकरोत्तर आंबेडकरवादी विचारवंतांनी आंबेडकरविचारांचा शोध घेऊन त्यावर भाष्य करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. १९२० ते १९५६ या कालखंडात डॉ.आंबेडकरांनी उभारलेल्या विविध जीवनलढ्यातून, विविध ग्रंथांतून व भाषणांतून जे विचार मांडले, ते 'आंबेडकरवाद' नावाने ओळखले जातात. आंबेडकरवाद ही डॉ.आंबेडकरांच्या तत्वज्ञानातून व लढ्यांतून उदयास आलेली एक जीवनपद्धती व विचारप्रणाली आहे. 'मानवतावाद' हा त्याचा गाभा आहे. या संदर्भात प्रकाश खरात लिहितात "आंबेडकरवाद हे मानवमुक्तीचे तत्वज्ञान आहे. जीवनाला नैतिक व लोकशाही मूल्ये देऊन नवा समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी व मानवी हक्कांसाठी लढणे ही जाणीव शिकविणारी चेतना आहे. माणसाला 'माणूस' म्हणून मूल्य मिळवून देण्यावर त्याचा भार आहे. 'माणूस' केंद्रस्थानी ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे विचार मांडले. त्यांवर भाष्य करण्याचे काम साठोत्तरी विचारकांनी केले.

त्यांचा सामाजिक विचारांचा मागोवा घेताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक महान भारतीय समाजशास्त्रज्ञ असल्याचा निर्वाळा अनेक अभ्यासकांनी दिला आहे. त्यांनी भारतीय समाजव्यवस्था, प्राचीन काळातील सामाजिक जीवन, जातिव्यवस्था, अस्पृश्यता या विषयांसंबंधीचे अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने अध्ययन करून अनेक महत्वपुर्ण ग्रंथ लिहिले. 'कास्टस इन इंडिया', 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट', 'हू वेअर शुद्राज', 'दी अनटचेबल' इत्यादी ग्रंथातुन जातीयता व अस्पृश्यता कशी निर्माण झाली. त्या का टिकुन राहिल्या. अस्पृश्य मूळचे कोण, या संदर्भात त्यांनी मांडलेले विश्लेषण समाजशास्त्रीयदृष्टया अत्यंत महत्वाचे आहे.

हिंदु धर्मात ईश्वर, आत्मा, परलोक इ. गोष्टींना महत्व दिल्यामुळे भारतीय समाजाचे पर्यायाने या देशाचे प्रचंड नुकसान झाले हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे भारतीय संविधांनाची निर्मिती करताना त्यांनी या गोष्टींना फाटा दिला. या संदर्भात अर्जुन डांगळे म्हणतात, "जुनी मूल्यव्यवस्था, आचार-विचार, धर्मशास्त्रावर आधारित जी विषम समाजव्यवस्था होती ती नाकारून समतेवर व मानवी मूल्यांवर आधारित अशी

एक व्यवस्था भारतीय राज्यघटनेव्दारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिली. एका अर्थाने नवीन भारतीय संस्कृतीची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली". भारतीय संविधानाच्या पंचविसाव्या कलमात त्यांनी धर्माची सत्ता झुगारून दिली आहे. समाजाच्या भौतिक विकासाच्या वाटचालीत निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या संदर्भात धर्माची लुडबुड त्यांना अमान्य आहे. सामाजिक बाबतीत धर्माचे असलेले महत्व कमी करण्यासाठी, मुळापासून सगळा समाज बदलून टाकण्यासाठी त्यांनी उचललेले हे अत्यंत महत्वाचे पाऊल आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचा सांस्कृतिक वेगळेपणा राजा ढाले, डॉ.प्रभाकर गणवीर, प्रा.दि.मा.खैरकर, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर इत्यादी अनेक विचारवंतानी मांडला आहे. त्यांच्या धम्मक्रांतीचे वेगळेपण सांगताना माणूस धर्माकरिता नाही, धर्म माणसाकरिता आहे. हे सूत्र डॉ.आंबेडकरांनी सर्वप्रथम मांडून ईश्वर, आत्मा यापेक्षा माणसाला महत्व, असणाऱ्या बुध्द धम्माचा स्वीकार केल्याचे राजा ढाले नमूद करतात परंतू लोकपरंपरेतून या त्रिपिटकाच्या माध्यमातून चालत आलेला बुध्द त्यांनी स्वीकारला नसल्याचे ते स्पष्ट करतात. ते म्हणतात, "डॉ.आंबेडकरांसारख्या एका महामानवाने बुध्दाच्या 'धम्मा' चा अंगीकार करताना ज्या चौकस नि चिकित्सक नजरेने त्यांनी अन्य 'धर्मा' कडे आणि पर्यायाने 'धर्म' या समग्र व्यवस्थेकडे तटस्थपणे पाहिले: त्याच चिकित्सक नजरेने त्यांनी परंपरेने आपल्यापर्यंत चालत आलेल्या 'बौध्द धर्मा' कडेही तटस्थपणे पाहिले. आणि तो तर्काच्या कसोटयांवर पारखून घेऊन, त्याच्यात घुसडला गेलेला धर्माचा उत्तरकालीन अंश, हा धमापासून अलग करण्यात आला. हा 'धम्म' म्हणजेच बुध्दाचा मूळ विचार होय. त्यामुळे त्यांच्या या बंडखोर कृतीचा प्रखर पैलू धर्मांतर हया गुळगुळीत संज्ञेतून व्यक्त होत नसल्यामुळे 'धम्मकांती' ही अभिनव संज्ञा सर्वस्वी उचित असल्याचे ते नमुद करतात.

Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

बुध्द धम्म हा भारतीय आहे. आपल्या अनुयायांना या देशात स्वाभीमानाने, हक्काने, निर्भयपणे जगता यावे म्हणुन त्यांनी बुध्द धम्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. समतेच्या, बंधुत्वाच्या पायावर या धम्माची उभारणी झाली आहे. या तत्वाचा हिंदु धर्मामध्ये अभाव आहे. त्यात व्यक्तिविकासाला वाव नाही. अशा धर्माचा त्याग केल्योने आपल्या बांधवाना निर्भयपणे या देशात राहता येईल, हा दूरदृष्टीचा विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीमागे आहे.

डॉ.मधुकर कासारे, डॉ.नरेन्द्रं जाधव, प्रा.मधुकर डोंगरे, डॉ.भालचंद्र मुणगेकर, डॉ.आ़नंद तेलतुंबडे, डॉ. वा. ना. कुबेर, यशवंत मनोहर आदी

विचारवंतानी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा सूक्ष्म आणि तपशिलाने अभ्यास करुन भारतीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांचे स्वतंत्र स्थान सिध्द केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे व्यासंगी होते. एम.ए., पी.एच.डी, डी.एस्सी. या अत्युच्च पदव्यांसाठी सादर केलेले प्रबंध, भुमिहीन मजूर, लहान जमिनी, खोतीपध्दती, महारवतन, सामुदायिक शेती, जमीन महसूल, जमीनदारशाहीचे उच्चाटन, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, धान्य प्रश्न यांबाबत मांडलेले विचार व निवडणुकांच्या वेळेचे जाहीरनामे आणि भारतीय घटनेवरील भाषणात प्रसंगानुरुप त्यांनी केलेले विवेचन, यातून त्यांचे अर्थशास्त्रीय विचार प्रकट झाले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आर्थिक नियोजनाचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांच्या मते, नियोजित अर्थव्यवस्था गरिबाच्या आर्थिक हितसंबंधची काळजी घेण्यास अधिक समर्थ असेल. विमाक्षेत्र, उद्योगधंद्यावर राष्ट्रहिताच्या दृष्टीने राज्यसंस्थेची मालकी हवी, असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी सामुदायिक शेतीची योतना. मांडली होती. अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या भारतीय शेतीच्या विकासासाठी त्यांना शेतीमध्ये अधिक गुंतवणूक हवी होती. जेणेकरुन तिचे औद्योगिकीकरण होईल. त्यामुळे भारतीय शेतकरी, शेती प्रगत होईल, असे त्यांना वाटते.

ते कोणत्याही प्रकारच्या अनुत्पादक वा उधळ्या खर्चाच्या पूर्ण विरोधी होते त्यांनी शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, घरबांधणी यांसारख्या सामाजिक सेवांवर अधिक शासकीय खर्चाचा पुरस्कार केला त्यांच्या आर्थिक विचारांचे महत्व प्रतिपादन करताना डॉ.भालचंद्र मुणगेकर म्हणतात. "सामुदायिक शेतीची तरतूद वगळता, डॉ.आंबेडकरांनी स्वंतत्र भारतसाठी सुचविलेली आर्थिक धोरणांची योजना म्हणजे निश्चितपणे मिश्र अर्थव्यवस्थेच्या योजनेचे प्रतीक होते. स्वातंत्र्योत्तर काळात, औद्योगिक धोरण निवेदन १९४८ वा आर्थिक धोरण ठराव १९५६ हे डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या प्रस्तावाशी पूर्णपणे मिळतेजुळते होते. या धोरणांचे औद्योगिकीकरणाचा पाया घालण्यात निश्चितपणे सहाय्य झाले." उद्योगधंदे व आयुर्विमा यांच्या राष्ट्रीयीकरणाबाबतचे त्यांचे विचार भारतीय आर्थिक प्रश्नांसंबंधीचा त्यांचा व्यासंग किती खोल होता, हेच दाखवतात. खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र असा अर्थव्यवस्थेत झालेला बनाव, आयुर्विमा कार्पोरेशनची स्थापना या भारतीय अर्थव्यवस्थेत आलेल्या नवीन गोष्टी, यांतून त्यांचे विचार किती अचूक होते, याचा प्रत्यय येतो.

Late Ramrao Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

त्यांच्या अर्थविषयक विचारांना एक नैतिक हेतू होता. मानवी कल्याणावर त्याचा कोणता परिणाम होतो, या दृष्टिकोनातून त्यांनी आर्थिक हालचालींचा अभ्यास केला होता. या संदर्भात डॉ.यशवंत मनोहर म्हणतात, "डॉ. आंबेडकर हे मूलत: अर्थमीमांसक आहेत. त्यांचा संपूर्ण अर्थशास्त्रीय चिंतनाचा नायक आहे रंजला गांजलेला माणूस! सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि एकूणच सांस्कृतिक कल्याणाचा समाजवाद आंबेडकरवाद सांगतो. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हीच आंबेडकरवादी अर्थशास्त्राची आणि समाजवादाची अव्यभिचारी प्रतिज्ञा आहे." त्यांच्या आर्थिक तत्वज्ञानाचा उद्देश सामाजिक न्याय हाच असल्यामुळे अस्पृश्य, अल्पसंख्यांक, शेतकरी, शेतमजूर या सर्वांच्याच कल्याणाचा विचार त्यांनी आर्थिक चिंतनातून मांडला आहे.

Warpudkar (A.) Dist. Parbhani Late Ramesh

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रसृष्टीची दखल घेऊन उत्कृष्ट पत्रकार व मराठी लेखनातले स्वयंभुत्व मांडण्याचे महत्तम कार्य रत्नाकर गणवीर, आप्पा रणपिसे, प्रा.सुखराम हिवराळे, प्रा.डॉ.गंगाधर पानतावणे, इ. विचारवंतांनी केले. त्यांच्या वृतपत्राचे सर्वप्रथम संकलन प्रा.रत्नाकर गणवीर यांनी केले. त्यांच्या मराठी लेखनाचा अभ्यास करुन डॉ.आंबेडकरांचा धर्मांतर विचार, त्याची कारणीमीमांसा, स्वतंत्र मतदारसंघांसंबंधीची भूमिका, भारतीय स्वांतत्र्यलढा आणि डॉ. आंबेडकर, डॉ. आंबेडकरांचे जाज्वल्य राष्ट्रप्रेम अशा अनेक मूलभूत बाबीसंबधी प्रा. रत्नाकर गणवीरांनी मांडलेले विचार साधार तर आहेतच परंतु त्यांच्या बहुविध कर्तृत्वावर प्रकाश टाकणारेही आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या लढयाच्या पाठीमागे निश्चित सूत्र असल्याचे स्पष्ट करुन ते लिहतात. "स्पृशांच्या आक्षेपांची किंवा विरोधाची पर्वा न करता. डॉ. आंबेडकरांनी सुरु केलेला लढा मनुष्य व देव यांच्यातील संबंध प्रस्थापित करणाऱ्या संतांच्या लढयासारखा लढा नव्हता, तर तो माणसातील संबंध प्रस्थापित करणारा होता. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचे लक्ष मानवी प्रतिष्ठा ,असल्याचे ते स्पष्ठ करतात.

'विलायतेहूनं डॉ. बाबासाहेबाची पत्रे' या संपादनातून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तित्वाचे अनेक पैलू वाचकांपुढे ठेवले. प्रास्ताविकात ते म्हणतात. "ही पत्रे बाबसाहेबांच्या अनेक मनोज्ञ विचारांचे दर्शन घडवितात. बाबासाहेबांनी आपल्या झंझावती जीवनात अनेक चिरस्मरणीय भाषणे केली आहेत. अनेक मौलिक व चिारगर्भ लेख प्रसविले आहेत. त्या साऱ्यांचे महत्व केंव्हाही अनन्यसाधारण असेच आहे. तथापि हया पत्रांनासुध्दा एक आगळेच महत्व आहे." या पत्रांतून विलायतेतील गोलमेज परिषदेचा वृतांत, आपल्या सहकाऱ्यासंबंधी, आंदोलनांसंबधी त्यांनी केलेले हितगुज, समाजोत्थनाची

तळमळ, काही संकल्प यांचा आलेख या पत्रांतून अनुभूत होतो. राजकीय, सामाजिक आणि राष्ट्रीय असे संदर्भ या पत्रांना असल्यामुळे ही पत्रे मराठी पत्रवाङ्मयाचा ठेवा आहे.

भारतीय स्त्रीला तिचे स्वतंत्र अस्तित्व, वारसाहक्क, अधिकार आणि प्रतिष्ठा मिळावी, हया अत्यंत व्यापक मानवी संवेदनातून कायदेमंत्री असताना डॉ. बाबासाहेब .आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची मांडणी केली होती दृ जिला पायाची दासी मानली, जिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेले, जिचे अधिकार नाकारले गेले अशा भारतीय स्त्रीला तिची अस्मिता देण्याचे महनीय कार्य त्यांनी हिंदू कोड बिलातून संकल्पिले होते. स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार, घटस्फोट दिल्यास पोटगीचा अधिकार, दत्तक घेण्याचा व दत्तक जाण्याचा अधिकार वडिलांच्या मिळकतीत मुलाच्या बरोबरीने समान वाटा, वारसाहक्क व स्वतःचा वारसा निश्चित करण्याचा हक्क या हिंदु कोड बिलात होता.

हिंदु कोड बिलाच्या पाठीमागील भूमिका विशद करताना प्रा. रत्नाकर गणवीर म्हणतात, "हिंदु कोड बिलाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक स्वप्न होते. भेदभावविरहीत एक कायदा प्रस्थापित करणे जातिभेदविरहित हिंदू समाजव्यवस्थेत एकजिनसीपणा निर्माण करणे आणि स्त्री पुरुषभेदविरहीत समता प्रस्थापित करणे, हे हिंदु कोड बिलाचे खरे उदिष्ट होते. प्राचीन भेदभावाच्या संकल्पना त्यागून आधुनिक प्रगम व पुरोगामी विचारसरणीनुसार समाजव्यवस्थेची पुनर्बांधणी करणे हे हिंदु कोड बिलाचे ईच्छित होते" संसदेत हिंदु कोड बिल स्थगित झाल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला परंतु पुढे पं. नेहरुंनी राजीनाम्याची धमकी दिल्यावर ते बिल खंडाखंडाने पारित झाले. स्त्रियाच्या हिताच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले हे कार्य अत्यंत मौलिक आहे. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु कोड बिल आणि भारतीय संविधनाच्या माध्यमातून स्त्रीमुक्तीचा राजमार्ग घडविला हे ऐतिहासिक सत्य आहे." असे डॉ. धनराज डहाट नमुद करतात.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासक्षेत्रात अनेक नवीन सिध्दांत मांडले. भारतीय इतिहासाच्या पारंपारिक कालखंड रद्द करुन त्यांनी भारतीय इतिहासाच्या कालखंडाची नव्याने मांडणी केली. शुद्रांच्या मूळ अवस्थेचा शोध घेवुन त्यांना शुद्रत्व कसे प्राप्त झाले. अस्पृश्य कोण होते. जातिव्यवस्थेचा उगम कसा झाला इत्यादीसंदर्भात त्यांनी केलेले विवेचन अत्यंत तर्कशुध्द आहे.

त्यांचे भारतीय इतिहसातील कार्य सांगताना प्रा.अनिल सिंगारे म्हणतात. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय इतिहासाला राजांच्या राजवाडयातुन व ब्राम्हणांच्या देवघरातुन बाहेर काढून इतिहासाच्या कक्षा रुंदायाचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. भारतीय वर्णव्यवस्थेने ज्या शुद्र व अतिशुद्रांना उपेक्षित ठेवलेले होते. ज्यांची इतिहासात इतिहासकारांनी सेवक, दास, गुलाम, आणि कारागीर अशीच नोंद घेतलेली होती. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या इतिहासाचा केंद्रबिन्दु किंवा नायक ठरवून नव्याने इतिहास लिहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही नवीन इतिहास लिखाणाची पध्दत आधुनिक काळातील Subaltern History हया विचारप्रवाहाला गतिमान करणारी आहे. असे नमूद करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च प्रतीचे इतिहासकार असल्याचे ते स्पष्ट करतात.

भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचे महान कार्य त्यांनी केले. त्यामुळे या देशातील वंचित पीडित, अस्पृश्य व शोषित लोकांना त्यांचे स्वत्व गवसले. याबाबत डॉ. प्रदीप मेश्राम म्हणतात, "बाबासाहेबांचे इतिहासलेखन आजही अभेद्य आहे. कोणताही देशी-विदेशी संशोधक त्यात त्रुटी किंवा चुक दाखवू शकला नाही. यावरुन हेच सिध्द होते की, त्यांच्यासारखा इतिहासवेत्ता या भूमीत जन्मला व त्यांनी आमचा खरा इतिहास आम्हास ज्ञात करवून दिला. हया त्यांच्या उपकाराची आम्ही कधीही परतफेड करु शकनार नाही."

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

भारतीय इतिहासामध्ये अनेक्षिततावाद (सबाल्टर्न) विचारप्रवाह प्रचलित होत आहे. जागतिक स्तरावर इटलीचा इतिहासकार ग्रामची व ऑस्ट्रेलियाचा इतिहासकार रणजित गुहा यांनी हया प्रवाहाचा प्रचार आणि प्रसार केला. भारतात मात्र सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षित लोकानांच आपला केन्द्रबिंदु समजून भारतीय इतिहासाची नव्याने पुनर्मांडणी केली. त्यामुळे भारतीय इतिहासक्षेत्रातील उपेक्षिततावादी प्रवाहाचे जनक म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करावा लागेल.

थोडक्यात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वृत्तपत्रविषयक, घटनाविषयक, स्त्रीविषयक, कामगारविषयक जे विचार आहेत त्या विचारांचा शोध घेऊन त्या विचारांचे महत्व साठोत्तरी विचारकांनी प्रतिपादले. हे सर्व विचार बुध्दिवाद, विज्ञानवाद, तर्काधिष्ठित असल्यामुळे व या विचारांत सदाचार, मैत्री, करुणा, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय इत्यादी मानवी मूल्यांना महत्व असल्यामुळे ते काळाच्या कसोटीवर खरे उतरल्याचे प्रतिपादन साठोत्तरी विचारकांनी केले आहे.

संदर्भ ग्रंथः-

१. आंबेडकरी चळवळीचे अंतरंग - अर्जुन डांगळे.
२. आंबेडकरवादी मराठी साहित्य - डॉ. यशवंत मनोहर.
३. बहिस्कृत भारतातील अग्रलेख - प्रा. रत्नाकर गणवीर.
४. इतिहासकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर - प्रा. अनिल सिंगारे.
५. आंबेडकरवादः समाज आणि संस्कृती - प्रकाश खरात.

□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani